समता चॅरीटेबल ट्रस्टचे मुखपत्र.

विश्वास + सुरक्षितता = समता

# समता वार्ता

मासिक

Making Learners Global
Samata International School

| वर्ष दुसरे – अंक सहावा | एप्रिल २०१५ | संपादक– ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे | पृष्ठे ४ | किंमत ५ रु.

## ३१ मार्चला आर्थिकपत्रके जाहीर करण्याची व ०% एन.पी.ए. राखण्याची परंपरा कायम राखत कोपरगावच्या समता पतसंस्थेच्या ठेवींमध्ये ७१ कोटी रुपयांची ३५% विक्रमी वाढ

कोपरगांव – कोपरगांवच्या समता नागरी सहकारी पतसंस्थेने स्थापनेपासून ३१ मार्च रोजी नफा तोटापत्रक व ताळेबंद जाहीर करण्याची परंपरा या वर्षी देखील कायम तर राखली आहे. त्याचबरोबर ठेव वाढ, गुंतवणूक व वसुली अशा सर्वच क्षेत्रात विक्रमी परंपरा कायम राखल्याची माहिती समता पतसंस्थेचे चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांनी दिली.

गत आर्थिक वर्षात महाराष्ट्रात अवकाळी पावसामुळे दुष्काळी परिस्थिती असतानादेखील समता पतसंस्थेच्या ठेवींमध्ये तब्बल ३५ टक्केने वाढ झाली आहे. पतसंस्था व बँकींग क्षेत्रात हा विक्रम मानला जाईल. ३१ मार्च २०१४ रोजी २०५ कोटी रुपयांच्या ठेवींमध्ये ३५ टक्के इतकी वाढ होवुन या ठेवी २७६ कोटी इतक्या झाल्या अशी माहिती व्हा.चेअरमन रामचंद्र बागरेचा यांनी दिली.

संस्थेची गुंतवणूक ८५ कोटी रुपयांची झालेली असुन या गुंतवणूकीचे प्रमाण ३१ टक्के पडलेले आहे. असे सरव्यवस्थापक सचिन भट्टड यांनी सांगितले. समताच्या ११ शाखा कार्यरत असुन ठेवीचे प्रमाण प्रतिशाखा २५ कोटी इतके पडले आहे. समताच्या कोपरगांव शाखेने तर १२२ कोटी ५० लाख रुपयांच्या ठेवी मिळवून कोपरगांव परीसरातील सर्वोच्च आर्थिक संस्था होण्याचा बहुमान पटकावल्याची माहिती कोपरगांव शाखेचे शाखाधिकारी संजय पारखे यांनी दिली. संस्थेचे कर्ज वाटपामध्ये टक्क्याने वाढ झाली आहे. ३१ मार्च २०१४ रोजी १४४ कोटी रुपयांच्या कर्जमध्ये रु ६६ कोटी रुपयांची वाढ होवून कर्ज वाटप रु २१० कोटी इतके झालेले आहे.

कठोर परंतु कायदेशीर वसुली करून थकबाकीचे नगण्य प्रमाण कायम राखीत ० टक्के एन.पी.ए.ची परंपरा देखील कायम राखल्याची माहिती वसुली विभाग प्रमुख जनार्धन कदम यांनी दिली.

संस्थेने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन कार्पोरेट पेपरलेस कार्यालय नुकतेच कार्यान्वीत केलेले असुन या कार्यालयाद्वारे बँकींग प्रणाली, फॉरेन्सीक ऑडीट कंट्रोल रुम, रिकव्हरी कंट्रोल रुम, ऑप्टीमायझर रेकॉर्डरुम, व्हिडीओ कॉन्फरन्सींग अशा विविध सुविधा कार्यरत केलेल्या आहेत.

समता पतसंस्थेने कॅशलेस बँकिंग करण्याकडे देखील वेगाने वाटचाल चालु केली आहे. मोबाईलद्वारे आर.टि.जी.एस. एन.ई.एफ.टी. मनि ट्रान्स्फर करून छोट्या गुंतवणूकदारांना विश्वासार्ह व जलदसेवा देण्याचा प्रयत्न समताच्यावतीने केला जात आहे.

डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड तसेच एटीएम सुविधा देखील कार्यरत होत आहे. तसेच घरपोहोच लॉकर सेवा, सहज सुलभ सोने खरेदी योजना सुरु करून समता पतसंस्थेने सेवाभिमुख कामकाज करण्याचे ठरविल्याचे ज्येष्ठ संचालक जितेंद्र शहा यांनी सांगितले.

## ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात नेत्रदिपक कामगिरी करणाऱ्या समताच्या शाखा

**कोपरगांव खंदक नाला शाखा–** कोपरगांव समता पतसंस्थेच्या खंदकनाला कोपरगांव शाखेच्या ३१ मार्च २०१५ रोजी ठेवी १२२ कोटी ५० लाखांच्या झाल्या असुन गत वर्षापेक्षा २६ कोटीपेक्षा जास्त वाढ झोली आहे. तर शाखेतील कर्ज वाटप ९३ कोटी ७७ लाखांचे झालेले असुन ते गतवर्षापेक्षा रु १७ कोटीहून अधिक रकमेने वाढलेले आहे व शाखेला नफाही विक्रमी झालेला आहे. अशाप्रकारे शाखेतील ठेवी वाढीचे प्रमाण २७ टक्के पेक्षा ज्यादा असुन कर्जवाटप वाढीचे प्रमाण २२ टक्क्यांपेक्षा ज्यादा आहे. सदर ठेवी वाढीसाठी आणि कर्ज वाटप वाढीसाठी शाखाधिकारी श्री.संजय पारखे, श्री.वाल्मीक वाणी आणि शाखेतील सर्व कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

**येवला शाखा–**येवला शाखेच्या दि. ३१ मार्च २०१५ रोजी ठेवी ३८ कोटी ६३ लाखांपर्यंत पोहचल्या असून गतवर्षापेक्षा त्यात साडेसहा कोटीने वाढ झालेली आहे. कर्ज वाटप २७ कोटी १७ लाखावर गेलेले असून त्यात जवळपास १६ कोटीने वाढ झालेली आहे. ठेवींची वाढ जवळपास २० टक्क्यांपेक्षाही ज्यादा असुन कर्जवाटपातील वाढ १३८ टक्क्यांपेक्षा ज्यादा आहे. यासाठी शाखाधिकारी श्री.रामदास बडनेरे आणि शाखेतील सर्व कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

**श्रीरामपुर शाखा–** श्रीरामपुर शाखेच्या दि. ३१ मार्च २०१५ अखेर ठेवी ३४ कोटी ४१ लाख ६८ हजार वर पोहोचल्या असुन गतवर्षापेक्षा त्यात ८ कोटी ७९ लाख ५५ हजार रकमेने वाढ झालेली आहे. तर कर्ज वाटप २३.०८ कोटीवर पोहोचले असुन त्यात सुमारे एक कोटीने वाढ झालेली आहे. ठेव वाढीचे शेकडा प्रमाणे ३८ टक्क्यांचे आसपास आहे तर कर्ज वाटप वाढीचे प्रमाण ५ टक्के आहे. यासाठी शाखाधिकारी श्री.सोपान पठारे, श्री.स्नेहल धुमाळ व शाखेतील सर्व कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

तिनही शाखांच्या या नेत्रदिपक प्रगतीबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री.ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे, उपाध्यक्ष श्री.रामचंद्र बागरेचा, संचालक सर्वश्री मोहनलाल झंवर, गुलाबशेठ अग्रवाल, अरविंदभाई पटेल, जितुभाई शहा, चांगदेवजी शिरोडे, राजकुमार बंब, संदीप कोयटे, निरव रावलिया, कचरु मोकळ, सौ.शोभाताई दरक, सौ.श्वेता अजमेरे, जनरल मॅनेजर सचिन भट्टड व असि.जन.मॅनेजर श्री.मगनलाल बागमार यांनी कोपरगांव खंदकमाला शाखा, येवला शाखा व श्रीरामपुर शाखांच्या शाखाधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

## श्रीमती काशीबाई दादाप्पा कोयटे ९२ व्या वर्षात पदार्पण

कोपरगांव –

**उपाध्यायोन दशाचार्य, आचार्यणाम् शतं पिता सहस्त्र तू पितृन माता गौरवेन अतिरिच्यते।**

अर्थात आपल्या कुळाचे धर्मविधींचे संपादन करणाऱ्या उपाध्यायापेक्षा वेद शिकविणारा आचार्य दसपट मोठा, आचार्यापक्षा पिता शंभरपट मोठा आणि पित्यापेक्षा माता हजारपटीने श्रेष्ठ असते. अशाच सर्वार्थाने श्रेष्ठ आणि ज्येष्ठ असलेल्या श्रीमती काशीबाई दादाप्पा कोयटे–समता पतसंस्थेचे चेअरमन श्री.ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांच्या मातोश्री तथा बाई यांनी ४ मार्च रोजी वयाची ९१ वर्षेपूर्ण करुन ९२व्या वर्षात पदार्पण केले. त्या निमित्ताने निवारा परिसरातील काशिदा या त्यांचे निवासस्थानी अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला होता.

त्या निमित्ताने साईकथा प्रवचनकार ह.भ.प. बाबूराव महाराज सुरासे यांचे आईची महती कथन करणारे प्रवचन व भजनाचा कार्यक्रम झाला. तसेच माऊली महाराज, आनंद संगीत विद्यालयाचे श्री.आण्णा आढाव, श्री.बाबासाहेब कापे, प्रकाश महाराज सोनवणे, डोखे महाराज, निवारा महिला भजनी मंडळ यांच्या भजनांचा व सुश्राव्य गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला. सर्वांनी भजनातून मातेची थोरवी, आदर व्यक्त करीत आजींना मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या. या सोहळ्याचे प्रारंभी आजींच्या कन्या सौ.पुष्पाताई वैद्य सुना सौ.सुहासिनीताई, सुवर्णाताई, रोहिणीताई नात सौ.कल्याणीताई नातसून सौ.स्वातीताई यांनी आजींचे औक्षण करून अभिष्टचिंतन केले. याप्रसंगी विविध मान्यवरांसह पणतू कुलदीप व मुक्ता हुरणे यांनी आजींसाठी कविता सादर केली. सौ.कल्याणीताई हुरणे यांनीही आमची आजी कवितेतून आजीची महती सांगितली तर श्री सुधीर कोयटे यांनी यावेळी माँ मेरी माँ गीत सादर केले. श्री.जगन्नाथ सोनेकर, दिगंबर भुसारे व गोपीनाथ निळकंठ यांनी समाजाच्यावतीने आजींचे अभिष्टचिंतन व सत्कार केला.




श्रीमती काशीबाई दादाप्पा कोयटे यांना मानपत्र प्रदान करताना व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष श्री. अजितशेठ लोहाडे, उपाध्यक्ष श्री. प्रकाशशेठ कवडे, खजिनदार श्री. तुळशीदासजी खुबानी सोबतकाका कोयटे

आजींना कोपरगांव येथील व्यापारी महासंघाच्यावतीने वाढदिवसानिमित्त मानपत्र देउन गौरविण्यात आले. व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष श्री.अजितशेठ लोहाडे, उपाध्यक्ष प्रकाशशेठ कवडे व खजिनदार तुळशीदासजी खुबाणी यांनी मानपत्र आजीना सन्मानपुर्वक अर्पण केले. सर्वांनी आजींना शतायु व्हावे तसेच त्यांना चांगले आरोग्य लाभावे अशा मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी सदर मानपत्राचे वाचनही करण्यात आले.

सदर सोहळ्यास श्री.श्रीकांत कोयटे, श्री.सुधीर कोयटे, श्री.संदीप कोयटे तसेच कोयटे कुटुंबातील सर्व सदस्य मुले, लेकी, जावई, सुना, नातू, पणतू, समाज बांधव तसेच समता पतसंस्थेचे सर्व संचालक व्हा.चेअरमन रामचंद्रजी बागरेचा, मोहनशेठ झंवर, जितूभाई शहा, राजकुमारजी बंब, अरविंदभाई पटेल, सौ.शोभाताई दरक, सौ.श्वेता अजमेरे, सुनील कंगले, बाळासाहेब खर्डे, डॉ. दत्तात्रय मुळे, डॉ. मुरुमकर डॉ.अजय गर्जे, डॉ.संजय उंबरकर, शहरातील व्यापारी वर्ग, प्रतिष्ठीत मंडळी व निवारा परिसरातील मान्यवरांची मोठी उपस्थिती होती. अभिष्टचिंतन सोहळ्यानंतर सर्व उपस्थितांसाठी सहभोजनाचा कार्यक्रम आयेजित करण्यात आला होता. संपूर्ण सोहळ्याचे सूत्र संचालन विभावरी नगरकर यांनी केले. समता परिवाराच्या वतीने आजींना दिर्घयुरोग्य लाभो अशी मन:पूर्वक शुभेच्छा!

## विश्वास + सुरक्षितता = समता

### संपादकीय

# समता जपते विश्वास आणि सुरक्षितता

कोणतेही ध्येय एकाएकी साध्य होत नसते त्यासाठी येणाऱ्या अडथळ्यांचा संकटांचा, संघर्षाचा सामना करीत पुढे जावे लागते, त्यानंतरच तुम्ही यशोशिखरावर पोचता आणि हे स्थान टिकवून ठेवण्यासाठी जिंकायची पुढे जाण्याची इच्छा सदैव जागृत ठेवावी लागते. गेली २९ वर्षे समता पतसंस्था यशोशिखरावर नेण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. ठेवीदरांनी, सभासदांनी, सर्वसामान्य ग्राहक व हितचिंतकांनी समतावर ठेवलेला विश्वास व त्यांना अपेक्षित सुरक्षितता देण्यात आम्ही कुठेही कसुर केलेली नाही आणि समता आपल्या तत्वापासून ढळलेली नाही, आणि भविष्यातही आपल्या तत्वांवर अढळ राहील.

स्थापनेपासून ३१ मार्च रोजी संस्थेचे नफा–तोटा पत्रक व ताळेबंद जाहीर करण्याची परंपरा कायम राखत संस्थेने ठेवींमध्ये ३५ टक्के वाढ होवून ठेवींचा आकडा २७६ कोटी रुपये तसेच १४४ कोटी रुपयांचे कर्जवाटपात ६६ कोटी रुपयांची वाढ होवून कर्जवाप २१0 कोटी रुपये झाल्याची माहिती जाहीर केली. ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या, आर्थिक वर्षात समताच्या ठेवी, गुंतवणूक व कर्ज वाटपात विक्रमी वृद्धी झाली आहे.

अवर्षण, अवकाळी पाऊस व मंदीचा काळ असूनही ठेवींमध्ये झालेली विक्रमी वाढ हा संस्थेवरील ग्राहक, ठेवीदार व कर्जदारांचा विश्वास आहे. कष्टाने कमावलेला पैसा सुरक्षित रहावा म्हणून तसेच ठेवलेल्या पैशांच्या मोबदल्यात लाभही मिळावा म्हणून लोक बँका व पतसंस्थांमध्ये पैसे ठेवतात. लोकांच्या कष्टाच्या, घामाच्या कमाईच्या पैशांचा विकासासाठी उपयोग व्हावा, पैशांचा अपहार व अपव्यय होता कामा नये. याबरोबरच छोटे व्यापारी व सर्वसामान्यांना आर्थिक आधार देण्यासाठी समता सदैव सजग व तत्पर असून ठेवीदारांचे विश्वास व त्यांना अपेक्षित सुरक्षितता जपण्यासाठी समताची कठोर कर्जवसुली झालीच पाहिजे ही भूमिका सदैव जपली जाते. कठोर बनाल तर कर्जवसुली होतेच व जनतेच्या पैशांची लूट न होता त्यांना सुरक्षितता तर मिळतेच त्याचबरोबर संस्थेवरील विश्वास अधिक दृढ होतो. ठेवींचे संरक्षण करायचे असेल तर प्रभावी कर्जवसुली झालीच पाहिजे. आमच्या मताशी आपण सहमत असाल आणि कर्ज वसुलीसाठी आपण सर्वांनी नेहमीच सहकार्य करावे असे आवाहन आम्ही करीत आहोत.

समताने अनेक कुटूंबांना आर्थिक हातभार लावून त्यांना स्थैर्य दिले असुन समतातुन छोटी कर्जेघेणारे कर्जदार समताचे मोठे ठेवीदार बनले आहेत आणि समताचे प्रचारकही बनलेले आहेत. त्यामुळे समताला कधीही वेगळ्याप्रकारे आपल्या प्रगतीसाठी जाहिरात करण्याची गरज भासलेली नाही. एक विश्वासार्ह व सुरक्षित आर्थिकसंस्था असा समताचा नावलौकिक आहे व तो आणखी दृढ व्हावा यासाठी समता परिवार सर्वांच्या सहकार्याने एकसंघपणे वाटचाल करीत आहे.

समताचे यशदायी वाटचालीचे श्रेय अर्थातच समताचे सभासद, ठेवीदार, कर्जदार, सर्वसामान्य ग्राहकांकडे तसेच समता परिवारातील सर्व घटकांकडे जाते. सर्वांच्या एकसंघ साथीने ही वाटचाल सदैव चालू राहील याची ग्वाही आम्ही देत आहोत.






## हार्दिक अभिष्टचिंतन वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

**एप्रिल २०१५**

| सभासदाचे नाव | जन्मतारीख |
|---|---|
| श्री. अमृतकर मधुकरराव लक्ष्मणराव | १ एप्रिल |
| सौ. छाया ओमप्रकाश मुंदडा | १ एप्रिल |
| श्री दिगंबरशेठ बाळाप्पा भुसारे | १ एप्रिल |
| श्री हरिशेठ बन्सीलालजी मंटाला | १ एप्रिल |
| श्री अमोल अरविंदजी पटेल | २ एप्रिल |
| सौ.आशाताई भालचंद्र विभुते | २ एप्रिल |
| श्री.प्रमोदराव मधुकरराव पाटील | ४ एप्रिल |
| सौ.शोभाताई अशोकजी दरक | ४ एप्रिल |
| श्री.वाल्मीक एकनाथ निकुंभ | ४ एप्रिल |
| श्री.सुनिलशेठ बाबुलालजी काले | ५ एप्रिल |
| श्री.प्रदीप शिवनाथ साखरे | ६ एप्रिल |
| श्री.अनिल रघुनाथराव बनकर | ८ एप्रिल |
| श्रीमती विमलबाई विश्वनाथ जोशी | ८ एप्रिल |
| श्री.हिंमतलाल विश्वनाथ पटेल | ९ एप्रिल |
| सौ.साधना अरुण वाणी | १० एप्रिल |
| सौ.माधुरी गोविंद मोरे | ११ एप्रिल |
| श्री.सय्यद असिफभाई शब्बीरभाई | ११ एप्रिल |
| श्री.सुहास पांडुरंग गाजरे | ११ एप्रिल |
| सौ.प्रियाताई दिनारराव कुदळे | १२ एप्रिल |
| श्री. बद्रीनारायणजी जगन्नाथजी मुंदडा | १२ एप्रिल |
| सौ.सुनंदाताई प्रकाशशेठ नागरे | १४ एप्रिल |
| सौ.सुधाताई बाळासाहेब बागडे | १५ एप्रिल |
| श्री. सुरेशदादा निंबा शिरोडे | १६ एप्रिल |
| श्रीमती पुष्पाताई निंबा शिरोडे | १६ एप्रिल |
| सौ.बसंतीबाई शामसुंदर बजाज | १७ एप्रिल |
| श्री.चंद्रकांत धरमचंद अमजेरे | १७ एप्रिल |
| श्री.अरुणशेठ त्र्यंबक भडकवाडे | १८ एप्रिल |
| श्री.शिवकुमार जगन्नाथ सोनेकर | १८ एप्रिल |
| श्री.रमेश हरी बागड | १८ एप्रिल |
| श्री.अनिलशेठ चंपालालजी भुतडा | १९ एप्रिल |
| श्रीमती सीमाताई पुरबराव कुदळे | १९ एप्रिल |
| सौ.सुनंदाताई संजीवराव कोद्रे | २० एप्रिल |
| श्री.अशोकराव विष्णू नागरे | २० एप्रिल |
| श्री.केवलजी भागचंदजी छुगाणी | २० एप्रिल |
| श्री.राकेशशेठ प्यारेलालजी भल्ला | २१ एप्रिल |
| श्री.प्रवीणशेठ शोभाचंदजी कोठारी | २१ एप्रिल |
| श्री.विश्वनाथजी शामलालजी राठी | २३ एप्रिल |
| श्री.अजितशेठ काशिनाथ भोंगळे | २४ एप्रिल |
| सौ.वासंती संजय वाळेकर | २४ एप्रिल |
| श्री.मोहनलाल हरलाल जोशी | २६ एप्रिल |
| बाबूलालशेठ बाळारामजी कलंत्री | २६ एप्रिल |
| सौ.उज्ज्वला नंदकिशोर बागरेचा | २७ एप्रिल |
| श्री.कैलास चिंधू येवले | २७ एप्रिल |
| श्री.बाबूराव विठ्ठलराव चांदर | २९ एप्रिल |

**शुभेच्छुक : समता परिवार, कोपरगांव**

# वाढदिवसानिमित्त हार्दिक अभिष्टचिंतन

## सर्वांना सुख लाभावे तशीच आरोग्यसंपदा


पार्थ आकाश गुप्ता
१ एप्रिल


वीर हरिष कराचीवाला
१ एप्रिल


साई अविनाश निकम
२ एप्रिल


यश शरद शिंदे
३ एप्रिल


सुयश मंगेश साखरे
४ एप्रिल


अनिकेत उमेश भामरे
६ एप्रिल


नील प्रवीण अलग
६ एप्रिल


आदित्य सचिन नरोडे
७ एप्रिल


कुणाल मनिष पटेल
८ एप्रिल


साईश राजेश नेतनकर
१० एप्रिल


तिलक ललीत पिपाडा
१३ एप्रिल


खुशी मुकुंद भूतडा
१३ एप्रिल


अक्षरा प्रशांत अग्रवाल
१४ एप्रिल


क्रिश भरत पोरवाल
१४ एप्रिल


श्रेयस गिरीश साठे
१५ एप्रिल


कृष्णा अजित मते
१५ एप्रिल


तनिष्का प्रवीण ठोंबरे
१६ एप्रिल


मुकूल पराग संधान
१६ एप्रिल


अजिंक्य किरण आढाव
१७ एप्रिल


आदित्य संतोष इंगळे
१८ एप्रिल


निधीषा चंद्रशेखर आव्हाड
१८ एप्रिल


साक्षी विजय वडांगळे
१८ एप्रिल



आयुष महावीर काले
१८ एप्रिल


ओम हनुमंत काकडे
१८ एप्रिल


आदीत्य पंकज गंगवाल
१८ एप्रिल


जय शीतलकुमार शिंगी
१८ एप्रिल


पृथ्वीराज शिवाजी धोंर्डे
२३ एप्रिल


प्रथम पंकज गंगवाल
२३ एप्रिल


वृषा सौरभ गडीया
२६ एप्रिल


प्रतिक्षा गजानन वाणी
२८ एप्रिल


ओम दिलीप दारुणकर
२९ एप्रिल


आदित्य किरण आढाव
२९ एप्रिल

**शुभेच्छुक : समता परिवार, कोपरगांव**

# समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये मॉम ॲण्ड मी स्पर्धा उत्साहात संपन्न

कोपरगांव–समता इंटरनॅशनल स्कूलच्या प्रि–प्रायमरी विभागामध्ये नुकतीच मॉम ॲंड मी स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. नुसती स्पर्धा हा उद्देश न ठेवता आई आणि मुलं यांच्यामधील सुंदर नातं या निमित्ताने उलगडण्यात आले. समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये केवळ पुस्तकी ज्ञान दिले जात नाही तर शाळेत मुलांचा सर्वांगीण विकास कशा पद्धतीने होईल यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. अगदी नर्सरीतील छोटीछोटी बालके ते आठवीतील विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांच्याच विकासासाठी शाळेतून मार्गदर्शन केले जाते. सध्याचे युग हे जाहीरातीचे युग असल्याने जाहिरातीचे माध्यमाचा वापर करून प्रि–प्रायमरी विभागासाठी मॉम ॲण्ड मी स्पर्धा घेण्यात आली.

या कार्यक्रमासंदर्भातील प्रस्तावना समता इंटरनॅशनल स्कूलच्या उपप्राचार्या सौ.लिसा बर्धन यांनी मांडली. तर कार्यक्रमास उपस्थित सर्व पालकांचे मिस अन्वी दुबे हिने स्वागत केले. मिस अन्वी डंबरकर व मास्टर राजवर्धन काळे यांनी आपल्या आईबद्दलच्या भावना व्यक्त कल्या युकेजीतील विद्यार्थ्यांनी आपल्या आईसाठी सुंदर गीताचे सादरीकरण केले. सौ.अंजू पंजाबी व सौ.स्वीटी भुसारे यांनी कार्यक्रमाचे परिक्षक म्हणून उपस्थिती दिली. याप्रसंगी चिंतना परिक्षेत जिल्हापातळीवर यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार समता इंटरनॅशनल स्कूलच्या व्यवस्थापकीय विश्वस्त सौ.स्वाती संदीप कोयटे व एक्झीकेटिव्ह कमेटी मेंबर सौ.सिमरन खुबाणी यांचे हस्ते करण्यात आला. मॉम ॲंड मी स्पर्धेतील मुलांनी आपल्या मातांसमवेत स्टेजवर टीव्ही मधील जाहिरातींचे सादरीकरण केले. ह्या जाहिरात सादरीकरणातून विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळेल असाच उद्देश ठेवून त्या अनुषंगाने जाहिरातींचे सादरीकरण करण्यात आले. अतिशय उत्साहवर्धक व निकोप वातावरणात संपन्न झालेल्या या स्पर्धेत प्रथम क्रमांक सौ.राजश्री उंबरकर, द्वितीय क्रमांक सौ.राधिका वाघ आणि तृतीय क्रमांक सौ.श्रेया पारिख यांनी प्राप्त केला. विजेत्यांना समता इंटरनॅशनल स्कूलच्या व्यवस्थापकीय विश्वस्त सौ.स्वाती संदीप कोयटे यांचे हस्ते पुरस्कार देवून गौरविण्यात आले. या सोहळ्याचे सूत्र संचालन प्रि प्रायमरी विभागप्रमुख सौ.स्वाती बेनके यांनी केले. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रि–प्रायमरी विभागाच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.


मॉम ॲण्ड मी स्पर्धेच्या विजेत्या सौ. राजश्री उंबरकर, राधीका वाघ, सौ. श्रेया पारीख आपल्या पाल्यांसोबत

## समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये मुलांचे आरोग्य तपासणी शिबीर संपन्न...

कोपरगांव–समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये नुकतेच मुलांचे आरोग्य तपासणी शिबीर पार पडले. शालेय वैद्यकीय तपासणी अहवाल हा मुलांसाठी असलेला अतिशय स्तुत्य असा उपक्रम आहे. या तपासणी शिबीरामध्ये वजन व उंची बरोबरच मुलांची दंत तपासणी व रक्तगट तपासणी करण्यात आली. कोपरगांव व शिर्डी येथील डॉक्टरांनी सदर तपासणी केली. कोपरगांव येथील डॉ.गोविंद भोसले, डॉ. लिना प्रितम जपे, डॉ.सोनल संदिप वाबळे तसेच शिर्डी येथील डॉ.मैथली यशोधन पितांबरे यांचा आपल्या सहकाऱ्यांसह या तपासणी शिबीरामध्ये सहभाग होता.

सदर तपासणीचा लाभ हा नर्सरी पासून ते इयत्ता आठवी पर्यंतच्या सर्व मुलांनी घेतला तपासणी शिबीराच्या प्रारंभी समता इंटरनॅशनल स्कूलच्या व्यवस्थापकीय विश्वस्त सौ.स्वाती संदिप कोयटे यांनी आलेल्या सर्व डॉक्टरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या वेळेस डॉक्टरांनी मुलांना मार्गदर्शन केले. मुलांशी संवाद साधताना डॉ.पितांबरे यांनी दातांचे आरोग्य राखणे किती महत्त्वाचे आहे याची माहिती मुलांना दिली. तर डॉ. बावळे यांनी दातांचे मॉडेल दाखवून मुलांना सविस्तर माहिती समजावून सांगितली. मुलांनी दररोज दात घासतांना कसे घासले पाहिजेत तसेच आपण चॉकलेट, कॅटबरी खाल्यावर ती दातांमध्ये जाऊन कशी अडकते याची माहिती डॉ.भोसले यांनी मुलांना दिली.

या दंत तपासणी शिबीरासोबतच डॉ.पितांबरे यांनी मुलांची रक्तगट तपासणी केली. आज आपण दातांच्या दवाखान्यात गेलो अथवा नुसता रक्तगट बाहेरच्या पॅथॉलॉजी लॅब मध्ये जाऊन तपासला तरी त्याची भरमसाठ फी द्यावी लागते. परंतु समता इंटरनॅशनल स्कूलच्या या डॉक्टर पालकांनी आपली सामाजिक जबाबदारी लक्षात घेऊन हे कार्य केलेले आहे. या बद्दल समता इंटरनॅशनल स्कूल या पालकांचे नेहमीच आभारी राहील. शिबीर यशस्वी करण्यासाठी समता इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य श्री.गोकुळ महाजन, उपप्राचार्या सौ.लिसा बर्धन तसेच सर्व शिक्षकवृंद यांचे सहकार्य लाभले.

# अनेक संकटाचा, अपयशाचा सामना करण्याचे बळ सहकारी संचालकांमुळे मिळाले – मोहनशेठ झंवर



कोपरगांव–समता पतसंस्थेचे ज्येष्ठ संचालक श्री.मोहनशेठ झवर यांनी २० मार्च रोजी वयाची ६८ वर्षेपूर्ण करत ६९ व्या वर्षात पदार्पण केले. समताच्या स्थापनेपासून संचालकपदी असलेल्या मोहनशेठ यांचा समताच्या प्रगतीशील वाटचालीत कायमच मोठा सहभाग आहे. यशात–अपयशात, संकटात सदैव त्यांनी समताची साथ दिलेली आहे. नव्हे अपयश पचवून संकटातून बाहेर काढण्याच्या संघर्षातही त्यांनी मोलाची साथ दिलेली आहे. २९ वर्षांपूर्वी समताची स्थापना झाली. त्यावेळी ग्राहकांच्या घरी, खेडोपाडी, वस्त्यांवर जावून त्यांनी प्रत्येकी ५० रुपये भाग भांडवल गोळा केले. प्रसंगी ठेवी स्विकारण्यासाठी ते ग्राहकांचे घरी जात मोहनशेठ यांचा सर्वसामान्यांमध्ये चांगला वावर असल्याने तसेच गावकऱ्यांशी चांगले व दृढ संबंध असल्याचा फायदा संस्थेला नक्कीच मिळाला व आजही मिळतो आहे. संस्थेच्या ग्राहकांचा त्यांचेवर चांगला विश्वास आहे. व तो टिकून राहावा यासाठी सदैव प्रयत्नशील राहिले व आहेत. अध्यरात्री येवून माझ्याकडून पैसे घेवून जा असा विश्वास ते ग्राहकांना देतात व वेळप्रसंगी म्हणणे खरेही केले आहे. समताच्या यशात त्यांचा मोठा वाटा आहे. वाढदिवसानिमित्त समता पतसंस्थेचे चेअरमन श्री.ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांनी त्यांचे अभिष्टचिंतन केले तर ज्येष्ठसंचालक श्री.गुलाबचंदजी अग्रवाल यांचे हस्ते शाल व पुष्पहार देवून सन्मान करण्यात आला. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना मोहनशेठ यांनी सांगितले की, खरे तर माझा स्वभाव शीघ्रकोपी परंतु काकांच्या सहवासात येवून मी रागावर ताबा मिळवायला शिकलो. अनेक संकटांचा, अपयशाचा सामना करण्याचे बळ मला समतातील माझ्या सहकारी संचालकांमुळे मिळाले. गेल्या २९ वर्षातील अनेक भले–बुरे अनुभव खंबीरपणे उभे राहण्याची, जगण्याची उमेद देवून गेले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन असि.जन. मॅनेजर श्री.मगनलाल बागमार यांनी केले. या प्रसंगी समता पतसंस्थेची सर्व संचालक जन.मॅनेजर सचिन भट्टड, शाखाधिकारी संजय पारखे, सर्व पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. श्री.मोहनशेठ झंवर यांना दिर्घायु व चांगले आरोग्य लाभावे अशा शुभेच्छा सर्व उपस्थितांच्या वतीने श्री.बागमार साहेब यांनी दिल्या. या प्रसंगी संचालक श्री.राजकुमार बंब आणि श्री.अरविंद भाई पटेल आणि सेवकांच्यावतीने श्री.महेश भावसार यांची समायोचीत भाषणे झाली.

# समताचे व्हा. चेअरमन श्री.रामचंद्रजी बागरेचा ६६ व्या वर्षात पदार्पण



कोपरगांव– समता पतसंस्थेचे नवनिर्वाचीत व्हा.चेअरमन श्री.रामचंद्रजी बागरेचा यांनी १२ मार्च रोजी वयाची ६५ वर्षेपार करुन ६६ व्या वर्षात पदार्पण केले. श्री बागरेचा यांचे कोपरगांव येथील विरोबा चौकात हेम मेडीकल असून मेडीकलचा व्यवसाय सांभाळतानाच ते समताच्या अगदी सुरुवातीच्या काळापासून समता पतसंस्थेच्या संचालकपदी आहेत. मितभाषी असलेले बागरेचा साहेब नेहमी सर्वांच्या मागे राहून काम करतात म्हणजेच सर्वांना त्यांचा पाठींबा असतो मात्र महत्त्वाच्या वेळी त्यांचा सल्ला वा त्यांनी दिलेला महत्त्वपूर्ण निर्णय नेहमीच समताच्या हिताचाच असतो. त्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सोहळ्यात चेअरमन श्री.ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांनी पेढा भरवून अभिष्टचिंतन केले. तर ज्येष्ठ संचालक श्री.मोहनशेठ झंवर यांच्या हस्ते त्यांना शाल व पुष्पहार देवून त्यांचा सत्कार करण्यात आला. संचालक मंडळातील सदस्य सर्वश्री. मोहनशेठ झंवर गुलाबशेठजी अग्रवाल. जितेंद्रभाई शहा, अरविंदभाई पटेल, राजकुमारजी बंब, चांगदेवजी शिरोडे, संदीप कोयटे, निरव रावलिया कचरु मोकळ, सौ.शोभाताई दरक, सौ.श्वेताताई अजमेरे, जन मॅनेजर श्री.सचिन भट्टड, शाखाधिकारी संजय पारखे, अन्य पदाधिकारी व कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते. असि. जन. मॅनेजर श्री मगनलाल बागमार यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. श्री बागरेचा यांच्या कार्याचा आढावा घेताना त्यांच्या धार्मिक व सामाजिक कार्याचाही गौरव करण्यात आला. समता परिवारातर्फे श्री.बागरेचा साहेबांना दीर्घायुरोग्य लाभावे अशा सदिच्छा देण्यात आल्या.

# ३ मे रोजी स्व.धनराजजी भनसाळी व्याख्यानमाला

## व्याख्याते सुप्रसिद्ध लेखक प्रा. नामदेवराव जाधव



• कोपरगाव– समता चॅरीटेबल ट्रस्ट, आणि सोनतारा भनसाळी ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. ३ मे रोजी स्व. धनराजजी मिश्रीलालजी भनसाळी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आलेले आहे.या व्याख्यानमालेचे व्याख्याते आहेत. श्री.छत्रपती शिवाजी महाराजांचे विविध दृष्टीकोनातील अभ्यासक आणि मातोश्री जिजाऊ यांचे वंशज सुप्रसिद्ध लेखक प्रा.नामदेवराव जाधव हे उद्योजक शिवाजी महाराज दी मॅनजमेंट गुरु या विषयावर व्याख्यानमालेचे पुष्प गुंफणार आहेत. ३ मे रोजी सायंकाळी ५.३० वाजता कृष्णाई मंगल कार्यालय, संभाजी चौक, धारणगांव रोड कोपरगांव येथे होणाऱ्या या कार्यक्रमाचा शहरवासियांनी लाभ घ्यावा असे आवाहन समता पतसंस्थेचे चेअरमन श्री.ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे, सोनतारा भनसाळी ट्रस्टचे विश्वस्त श्री.अरविंद भनसाळी, श्री.संजय भनसाळी व व्याख्यानमालेचे संयोजक श्री.राजकुमारजी बंब यांनी केल आहे.

# समताचे हितैषी श्री.जितेंद्रभाई शहा नाबाद ६१



समता पतसंस्था स्थापन करण्याचा निर्णय घेण्यापासून ते आज प्रगतीपथावर राहून महाराष्ट्रात एक अग्रगण्य पतसंस्था म्हणून नावारुपाला आलेल्या समता पतसंस्थेचे सर्वार्थाने हित जपणारे व स्थापनेपासूनच अत्यंत काटकसरीने संस्थेच्या प्रगतीत भर घालणारे, सर्व कर्मचाऱ्यांना आपले जवळचे वाटणारे संस्थेच्या भल्यासाठी सतत कार्यरत असलेले व समतासाठी सर्वाधिक वेळ देणारे समता पतसंस्थेचे ज्येष्ठ संचालक श्री.जितेंद्रभाई शहा यांनी वयाची ६१ वर्षेपूर्ण करीत ६२व्या वर्षात पदार्पण केले. खरे तर दररोजच्या कार्यव्यापाला माणूस कंटाळतो परंतु शहासाहेब दररोज दुपारी तीन वाजता समताच्या कार्यालयात उपस्थित असतात. त्यांच्यावर असलेल्या सर्व जबाबदाऱ्या तत्परतेने पार पाडतात. त्यांचा कामाचा आवाका व उत्साह तरुणांना लाजविणारा असतो नव्हे सदैव कार्यरत रहाण्याचा त्यांचा आदर्श सर्वांपुढे आहे. संस्थेतील बारीक–सारिक गोष्टींकडे त्यांचे लक्ष असते. चुकीचे काही आढळल्यास ते खडसावून जाब विचारणार हे कर्मचाऱ्यांना ठाऊक असल्याने कर्मचारी नेहमीच काळजी घेतात. समताच्या हितासाठी सतत सजगपणे निर्णय घेताना ते सर्वच बाबतीत काटकसर करुन संस्थेचे हित जपतात, खरेदी कोणतीही असो शहासाहेब स्वत: मुंबइला जावून खरेदीत कुठल्याही प्रकारे ज्यादा पैसे जाणार नाही, फसवणुक होणार नाही, वाहतुकीसाठी अवावजवी हमाली जाणार नाही इत्यादी बाबींची काळजी घेवूनच निर्णय घेतात. कर्मचाऱ्यांना काही अडचणी असतील, त्यांचे काही प्रश्न असतील तर ते अगदी विश्वासाने शहा साहेबांकडे जातात आणि त्यांना योग्य ते मार्गदर्शन मिळतेच.

त्यांचे वाढदिवसानिमित्त समता परिवारातर्फे आयोजित छोटेखानी समारंभात व्हा.चेअरमन श्री.गुलाबचंदजी अग्रवाल यांनी त्यांना शाल व पुष्पहार देवुन अभिष्ट चिंतन केले. तसेच चेअरमन श्री.ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांनी पेढा भरवून त्यांचे अभिष्टचिंतन केले. श्री. मोहनशेठ झंवर, श्री.गुलाबचंदजी अग्रवाल, श्री.राजकुमारजी बंब, श्री.अरविंदभाई पटेल यांनीही शहासाहेबांचे अभिष्टचिंतन केले व त्यांना दिर्घायुरोग्य लाभो अशा शुभेच्छा दिल्या. समताचे असि.जन. मॅनेजर श्री.बागमार साहेब यांनी शहा साहेबांच्या संस्थेसाठीच्या कार्याबद्दलचा धावता आढावा घेतला. तसेच राजकुमार बंब, अरविंदभाई पटेल यांनी संस्थेसाठी सर्वाधिक वेळ देत असल्याबद्दल त्यांचा गौरव करुन आभार मानले श्री.महेश भावसार यांनी आपल्या मनोगतातून संस्थेप्रमाणेच कर्मचाऱ्यांचेही हित जपणाऱ्या शहा साहेबांना समता परिवारातर्फे शतायू व चांगले आरोग्य लाभावे अशा सदिच्छा दिल्या.

# श्री रघुनाथ औताडे समताच्या सेवेतून निवृत्त



कोपरगांव–समता पतसंस्थेतील १५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३१ मार्च रोजी श्री. रघुनाथ सदाशिव औताडे सेवानिवृत्त झाले. समता पतसंस्थेच्या उन्नतीच्या काळाचे साक्षीदार असलेले श्री.औताडे संस्थेच्या हितासाठी काम करणारे व शिस्तपालनाच्या बाबतीत काटेकोर अंमलबजावणी करताना शिस्तपालन न करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी कठोरपणे वागणारे म्हणून सर्वपरिचित आहेत. मात्र त्यांचे हे निर्णय संस्थेच्या हिताचेच असत. कठोर शिस्त पालनामुळे त्यांनी अनेकांना रोषही पत्करला तथापि कर्मचारीही एक वडीलधारी व्यक्ती या नात्याने त्यांच्या आदेशांचे पालन करीत त्यांच्या स्वत:च्या कामातही ते कर्तव्यनिष्ठपणे वागत कर्मचाऱ्यांवर त्यांचा एकप्रकारचा वचक होता. ३१ मार्च रोजी समता पतसंस्थेला झालेल्या विक्रमी ठेववृद्धी व अन्य महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती देण्यासंदर्भात झालेल्या बैठकीत श्री.औताडे यांना सन्मानपूर्वक निरोप देण्यात आला. खरे तर नियमाप्रमाणे सर्वांचीच निवृत्ती होत असते. परंतु संस्थेसाठी हितैषी असणारा कर्मचारी तसेच आपल्यातील एक सहकारी निवृत्त होत असण्याची खंत सर्वांच्याच मनोगतातून व्यक्त झाली. या प्रसंगी चेअरमन श्री. ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे व संचालक श्री. राजकुमारजी बंब यांनी औताडे यांना आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. समताचे ज्येष्ठ संचालक श्री.गुलाबचंदजी अग्रवाल यांचे हस्ते श्री.औताडे यांचा शाल व पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला. सहकर्मचारी श्री.शशिकांत संत व महेश भावसार यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त करीत सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संचालकमंडळातील सर्व सदस्य जन.मॅनेजर श्री.सचिन भट्टड, शाखाधिकारी श्री.संजय पारखे, अन्य पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

'समता वार्ता' हे पत्र प्रकाशक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे ''समता चॅरीटेबल ट्रस्ट'' कोपरगाव यांचेसाठी मुद्रक किरण चंद्रकांत माळी यांनी शिवम् ग्राफिक, निवारा कॉर्नर, कोपरगाव जि अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून समता पतसंस्था कोपरगाव ता. कोपरगाव जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले संपादक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे मो. ९८२२४३५२५५/९३७१३३३५५५, सहसंपादक: बेबी मनोहर मराठे, ऑफिस फोन ०२४२३ २२५५५७/८ ई–मेल : samtavarta@gmail.com (या अंकामध्ये छापलेल्या मजकुरांशी संपादक/प्रकाशक सहमत असतिलच असे नाही. वादविवाद कोपरगाव न्यायकक्षेत) RNI NO. MAHMAR43417 /13-TC